जागतिक बँक अर्थसहाय्यीत

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प

सहकार व पणन विभाग, महाराष्ट्र शासन

प्रकल्प समन्वय कार्यालय

प्लॅट नं. एफ/ई/७८, पहिला मजला, भु -विकास बँकेचे प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७

दूरध्वनी ०२०-२४२७०३१५/१६, फॅक्स ०२०-२४२७०३२२, ई-मेल- macp2009@ymail.com

जा.क्र : एमएसीपी/पीसीयू/ईएससी/परिपत्रक/ ९६७/२०११ दि.१४/११/२०११

## परिपत्रक

### विषय - सेवा पुरवठादाराकरिता मार्गदर्शक सुचना - पर्यावरण व्यवस्थापन

महाराष्ट्र शासन जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प राबवित आहे. या प्रकल्पाचे मुख्य उद्दीष्ट राज्यातील शेतकरी समुदायाची उत्पादकता, त्यांचा नफा आणि बाजार संपर्क वाढविणे आहे.

**१. एकात्मिक पर्यावरण व सामाजिक मूल्यांकन अभ्यास (IESA)**

जागतिक बँकेचा कुठलाही प्रकल्प हाती घेताना त्याचे पर्यावरण व सामाजिक मूल्यानंक करणे गरजेचे आहे. जागतिक बँकेच्या मार्गदर्शक सुचंनाप्रमाणे महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणी संबंधीत असणारे महत्वाच्या पर्यावरण विषयक व सामाजिक मुद्यांची निवड निश्चित करणे व या अभ्यासाचा उद्देश सदर प्रकल्प राबविताना प्रत्येक टप्प्यावर योग्य प्रकारे पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन होण्यासाठी विहित उपाययोजना निश्चित करणे असा होता. करीता प्रकल्पा तयारीचा एक भाग म्हणून एकात्मिक पर्यावरण व सामाजिक मूल्यांकन (IESA) अभ्यास केला आहे.

**२. पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF)**

प्रकल्प राबविताना प्रत्येक टप्प्यावर योग्य प्रकारे पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन होण्यासाठी व खालील बाबींच्या पूर्ततेसाठी IESA अभ्यासातून पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) तयार करण्यात आला.

i. प्रकल्पाच्या तयारी अंमलबजावणी व संनियंत्रणामध्ये प्रकल्पाच्या पर्यावरण व सामाजिक बाबत मुद्दयांना समाविष्ट करणे, आणि

ii. प्रकल्पामधून होणारे पर्यावरण विषयक व सामाजिक फायदे अधोरेखित करणे तसेच त्यासंबंधी उद्‌भवू शकणा-या संभाव्य धोक्यांबाबत यथोचित उपाययोजना निश्चित करणे.

संपूर्ण प्रकल्प राबवित असताना पर्यावरण व सामाजिक मुद्यांना पद्धतशीरपणे ओळखणे व त्यावर योग्य ती कारवाई करणे करिता ESMF चा उपयोग करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पामध्ये तिन्ही प्रकल्प अंमलबजावणी कक्षांनी प्रकल्प राबवित असताना व त्यांनतर होणा-या संभाव्य धोक्यांबाबत उपाययोजना करणे करिता तसेच उपप्रकल्पांच्या छाननी करीता ESMF चे

पालन करणे जरूरी आहे. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प अंतर्गत सेवा पुरवठादाराने www.msamb.com या MSAMB च्या संकेतस्थळावर उपलब्ध IESA अहवालाचे prints घेऊन ESMF च्या पूर्ततेकरिता सखोल अभ्यास करावा.

**३. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाचा पर्यावरण बाबत दृष्टिकोन**

IESA अभ्यासात असे आढळून आले की, प्रकल्पामध्ये पर्यावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नगण्य असून पर्यावरण सूदृढ करण्याच्या दृष्टीने पोषक असे परिणाम घडवून आणणाच्या संधी उपलब्ध आहेत.

i. या प्रकल्पामध्ये बहुतांश उपक्रम पूर्वीपासूनच प्रचलित आहेत व त्यांच्या अंमलबजावणी पद्धतीमध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ज्यामुळे प्रचलित पद्धतीमध्ये सुधार घडवून आणून सकारात्मक परिणाम घडवून आणण्याकरीता प्रयत्न जरूरी आहेत.

ii. FCSC, गोदाम इ. च्या बांधकामासाठी निवडलेली जागा ही उत्पादन केंद्रांच्या जवळ असावी व पक्क्या रस्त्यांनी जोडलेली असावी.

iii. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जमिन ही वन-जमिन अथवा प्रतिबंधीत क्षेत्रात नसावी आणि त्यामुळे बाजारपेठेत होणा-या सुधारामुळे कुठल्याही प्रकारे जमिनीच्या वापरात बदल किंवा नैसर्गिक संपदेला धोका संभवणार नाही.

iv. बाजारपेठेत उपलब्ध असणा-या सोयी सुविधांमध्ये प्रस्तावित सुधारणामुळे शेतमालाच्या खरेदी विक्रीच्या प्रमाणात होणा-या वाढीमुळे निर्माण होणा-या घन कचरा / जैविक कचरा व्यवस्थापन करिता सुविधा करावी. या अनुषंगाने IESA अहवालामध्ये परिणामकारक घन कचरा व्यवस्थापनाबाबत उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत.

v. शेतमाल विपणनाच्या उन्नत संधी प्राप्त झाल्यामुळे परिणामी पिकांच्या विक्रीयोग्य उत्पादकता वाढीसाठी शेतकरी मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते तसेच किटकनाशकांचा वापर करतील. त्या अनुषंगाने प्रकल्पाकरिता एकात्मिक किड, मृदा अन्नद्रव्य व्यवस्थापन आराखडा विकसीत करण्यात आलेला आहे. ESMF मध्ये याचा अंतर्भाव केला आहे.

vi. नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण करणेसाठी या प्रकल्पामध्ये पर्यावरण पोषक अशा पर्यायी साधनांचा वापर करणाच्या संधी आहेत. त्यामुळे बांधकाम संबंधीत कामांसाठी पर्यावरण पूरक अशा सामुग्रीची शिफारस करावी.

- कोळशावर आधारीत विद्युत निर्मिती केंद्राच्या १०० किमी भागात फ्लाय ॲशने तयार केलेल्या सामुग्रीचा जसे विटा, सिमेंट, सखोल जागा भरण्याकरिता वापर करावा, जेणेकरून या विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणा-या फ्लाय ॲश या घनकच-याच्या विल्हेवाटीस मदत होईल व त्यामुळे पर्यावरणावर पडणारा भार कमी करण्यास देखील मदत होईल. रस्ते तयार करताना खड्डे भरण्यासाठी देखील फ्लाय ॲशचा उपयोग करू शकतो.

- बांधकामाच्या जागी कॉक्रीट मिक्सर पंप इ. धुतल्यानंतर फेकण्यात येणा-या पाण्याचा उपयोग curing करिता करता येऊ शकतो.
- भाजलेल्या विटांच्या जागी फ्लाय ॲश विटांचा उपयोग केल्यास विटांच्या भट्ट्यांमुळे होणारे प्रदुषण रोखले जाऊ शकते.

**४. सेवा पुरठादाराकरिता मार्गदर्शक सुचना**

**४.१ प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषी पणन) सेवा पुरवठादार**

- ESMF मध्ये उपप्रकल्पांची छाननी प्रक्रिया तसेच संनियंत्रण उपाययोजना समाविष्ट केल्या आहेत. प्रकल्प समन्वय कक्ष अहवालात नमूद ठराविक बाबींवर आधारीत उप प्रकल्पांची छाननी करेल आणि त्या आधारे प्रकल्पामध्ये त्याचा अंतर्भाव करणेबात ठरवेल.
- जेथे भौतिक पुनर्वसन किंवा नैसर्गिक साधनसंपदेला धोका संभवत असल्यास असे उपप्रकल्प सदर प्रकल्पाकरिता पात्र होणार नाही.
- IESA अहवालामधील पृष्ठ क्र. ८५ वर छाननी प्रक्रिया नमूद केली आहे. प्रकल्पाच्या पूर्व तयारी, अंमलबजावणी पूर्व, कार्यान्वयन पूर्व आणि कार्यान्वयनाचे वेळी छाननी करिता पर्यावरण व सामाजिक बाबींवर आधारीत तयार केलेली छाननी प्रपत्रे IESA अहवालामधील Appendix H मध्ये जोडलेली आहेत. प्रकल्पामध्ये संबंधीत सेवापूरवठादाराने प्रकल्पाच्या विविध टप्प्यावर लागू असलेली छाननी प्रपत्रे भरून संबंधीत अधिका-यांकडे जमा करावी.
- APMC आणि आठवडी बाजारांच्या बाजारपेठ नुतनीकरण आराखडा (MMIP व RH-MIP) मध्ये अंतर्भूत करावयाच्या पर्यावरण बाबत उपाययोजना :

  पर्यावरणावर होणारे संभाव्य परिणाम व त्याबाबत कराव्या लागणा-या उपाययोजनांची सारणी APMC व RH करिता प्रकल्प समन्वय कक्षाने तयार केलेल्या प्रत्येकी ८ MMIP व RH-MIP मधील प्रकरण नं. ८.० मध्ये दिलेली आहे. यापुढे सेवा पुरवठादारास तयार कराव्या लागणा-या MMIP व RH-MIP करीता पी.सी.यु. ने तयार केलेले MMIP व RH-MIP संदर्भासाठी बघावे.

  बांधकामाचे वेळी सभोवतालचे पर्यावरण सुदृढ करण्यासाठी काही मुख्य सुसाध्य उपाययोजना खालील प्रमाणे आहेत.

  i. बांधकामासाठी झाडे तोडावी लागणार असल्यास त्याचा गोषवारा देणे, उदा. झाडाचे नाव, किती झाडे तोडावी लागणार आहेत इ.
  ii. घन कचरा व्यवस्थापनाकरिता गरजेप्रमाणे सुविधा करणे. उदा. गांडूळ खत, बायोगॅस निर्मिती सयंत्र
  iii. विघटनशील व अविघटनशील घन कचरा जागेवरच वेगळा करण्याकरिता व खात्री करणेकरिता योजना
  iv. बांधकामाकरिता पर्यावरण पूरक सामुग्रीचा वापर करणे

v. नविन बांधकामाचे छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन करण्याच्या यंत्रणेचा अंतर्भाव करणे.

vi. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी व संवर्धनाकरिता विविध उपाययोजन नमूद करणे जसे पिण्याच्या पाण्याच्या सुविधेमधील निर्माण झालेले सांडपाणी झाडांच्या लागवडीकरीता उपयोगात आणणे, बांधकामाची मशिनरी धुतल्यानंतर फेकण्यात येणा-या पाण्याचा curing करिता उपयोग करणे, जास्त उतार असलेले toilet pans इ. ची सुविधा करणे

vii. सांडपाण्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणेकरीता उपाययोजना करणे जसे अस्तित्वात असलेल्या सांडपाणी व्यवस्थेला जोडणे, सेप्टीक टँक, सोक पिटची सुविधा इ.

viii. सेवा पुरवठादाराने बांधकामअंती जमा झालेल्या मलब्याच्या विल्हेवाटीसाठी योजना द्यावी व त्याची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी.

सेवा पुरवठादारने गरजेनुसार वरील मुद्यांना MMIP व RH-MIP मध्ये अंतर्भूत करणे जरूरी आहे.

**४.२ प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) सेवा पुरवठादार**

कृषि माल विपणनाच्या उन्नत संधी प्राप्त झाल्याने शेतीमधून जास्तीत जास्त उत्पन्न घेण्याकरिता रासायनिक खते व किटकनाशकांचा उपयोग वाढेल. त्यामुळे प्रकल्पाकरिता एकात्मिक किड आणि मृदा अन्नद्रव्य व्यवस्थापन (IPM/INM) आराखडा विकसित करण्यात आला आहे व ESMF मध्ये याचा अंतर्भाव केलेला आहे.

i. प्रकल्पामध्ये सक्षमीकरण आणि प्रशिक्षण देणे व मार्गदर्शक प्रात्यक्षिकांकरिता ATMA नोडल एजन्सी म्हणून काम बघणार आहे. सेवा पुरवठादाराने ATMA च्या प्रशिक्षण व मार्गदर्शक प्रात्यक्षिकांमध्ये ESMF प्रमाणे IPM व INM चा अंतर्भाव होत असल्याची खात्री करावी.

ii. सेवा पुरवठादाराने शेतक-यांमध्ये IPM व INM, organic farming आणि शाश्वत शेतीबाबत जागरूकता निर्माण करावी व त्यांना या करिता प्रोत्साहन द्यावे.

iii. सेवा पुरवठादाराने शेतक-यांना कमीतकमी पाणी वापरून शेती करण्याचे व पाण्याच्या संकलनाचे महत्व सांगावे व त्याबाबत जागरूकता निर्माण करावी.

iv. सेवा पुरवठादाराने वरील सर्व उपक्रमांमध्ये समाजातील दुर्बल घटकांचा सहभाग होत असल्याची खात्री करावी व त्यांना प्रोत्साहन द्यावे.

**४.३ पशुसंवर्धन विभाग सेवा पुरवठादार**

विक्रीयोग्य सुदृढ जनावरांचा पुरवठा व पशुपालन करणा-या शेतक-यांना बाजारपेठेचा संपर्क वाढवून देण्याच्या उद्देशाने प्रकल्पात एकूण २४ जनावरांच्या बाजारपेठांचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. पशुपालन संबंधीत वाढते औद्योगिक घटक, चा-याच्या उपलब्धतेमध्ये होणारी घट, हवामानामध्ये होत असलेल्या बदलांबाबत जनावरांचे साधर्म्य इ. पर्यावरणावर होत असलेले परिणाम आहेत. त्यामुळे प्रकल्पामध्ये पशुपालनाकरिता IPM आराखडा विकसित करण्यात आलेला आहे. ESMF मध्ये देखील याचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

प्रकल्प समन्वय कक्षातर्फे जनावरांचे बाजारपेठ, पशुपालन व त्यामुळे पर्यावरणावर होणा-या परिणामांचा स्वतंत्र अभ्यास करण्यात आला. प्रकल्पात नुतनीकरणाकरीता निवड झालेल्या एका जनावरांच्या बाजारपेठेमध्ये हा अभ्यास करण्यात आला.

i. सेवा पुरवठादाराने बाजारपेठेत व प्रकल्पाच्या अंतर्गत येणा-या भागातील जनावरांचे स्वास्थ व आरोग्याबाबत पशुपालकांमध्ये जागरूकता निर्माण करावी व त्याची खात्री करावी.

ii. सेवापुरवठादाराने पशुपालकांना चारा व शेणखत (manure) च्या परिणामकारक व्यवस्थापनाबाबत जागरूक करावे व प्रोत्साहन द्यावे. जनावरांच्या विष्ठेची (manure) साठवणूक घन (वाळलेल्या) अवस्थेत करावी जेणेकरून वैश्विक तापमान वाढीस (Global Warming) कारणीभूत असलेल्या हरितगृह वायू (Green House gases) मधील मिथेन (methane) या हानीकारक वायूचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.

iii. सेवा पुरवठादारने शेतक-यांना / पशुपालकांना पशुच्या खाद्यांमध्ये मका आणि सोया न देता अल्फा अल्फा व जवस यांचा अंतर्भाव करण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे जनावरांच्या अन्न पचन क्रियेवर ताण येणार नाही व ढेकरचे प्रमाण कमी होईल. जेणेकरून ढेकर मधून मिथेन वायू बाहेर पडतो त्यास रोखण्यास मदत होईल.

iv. शेतक-यांना सामुदायिक तत्वावर घनकचरा व्यवस्थापनाकरिता बायोगॅस सयंत्र उभारण्यास सेवा पुरवठादाराने प्रोत्साहन द्यावे व त्याचे महत्व सांगावे. बायोगॅस सयंत्रामुळे हे शेतकरी उर्जानिर्मितीबाबत स्वयंपूर्ण होतील. याच बरोबर त्यांना या संयंत्रामधून उत्कृष्ट दर्जाचे खत देखील मिळेल. या खतामध्ये किटक नसतात व ते जमिनीची पोत व मातीचा कस वाढविण्याच्या दृष्टीने उपयोगी आहे.

## ५. जबाबदारी व माहितीचा पूरवठा

i. प्रकल्पा समन्वय कक्षातील पर्यावरण तज्ञ व समाज विकास तज्ञ तिन्ही प्रकल्प अंमलबजावणी कक्षांसोबत समन्वय साधतील.

ii. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषी पणन) येथील समाज विकास व पर्यावरण अधिकारी उपप्रकल्पातील पर्यावरण व सामाजिक बाबीं बाबत जबाबदार असतील.

iii. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) येथील सामुदाय विस्तार अधिकारी उपप्रकल्पातील पर्यावरण निगडीत बाबींबाबत जबाबदार असतील.

iv. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पशुसंवर्धन) येथील नोडल ऑफिसर समुदाय विस्तार अधिका-याचा अधिक कार्यभार बघतील व ते उप प्रकल्पातील पर्यावरण निगडीत बाबींबाबत जबाबदार असतील.

v. ESMF च्या पूर्ततेबाबत सेवा पुरवठादार संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील वरील अधिका-यांशी संपर्क साधेल.

vi. सेवा पुरवठादाराने प्रकल्पात नमूद केल्याप्रमाणे बाजारपेठांमध्ये पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन होत असल्याची खात्री करणे.

vii. सेवापुरवठादाराने प्रकल्प अंमलबजावणी कक्ष येथील समाज विकास व पर्यावरण अधिका-यांस ESMF च्या अंमलबजावणी बाबत कालबाह्य (तिमाही) अहवाल सादर करणे.

viii. ESMF च्या अंमलबजावणीमध्ये काही त्रुटी असल्या सेवा पुरवठादाराने तसे जबाबदार अधिका-यास कळवावे व त्यावर मिळालेल्या मार्गदर्शनाप्रमाणे कार्यवाही करावी.

ix. प्रकल्प समन्वय कक्ष व प्रकल्प अंमलबजावणी कक्षाने प्रकल्पाच्या प्रगती सबंधात मागीतलेली माहिती सेवा पुरवठादार संकलित करून सादर करेल.

**प्रकल्प संचालक**
**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**

प्रति,

१) **नोडल ऑफिसर-** प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषी पणन), प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषी) व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पशुसंवर्धन) - यांचे मार्फत सेवापुरवठादारांना वितरणाकरीत

२) समन्वयक, कृषि व पशुसंवर्धन (पीसीयू) - माहितीसाठी